# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

नवराष्ट्र
www.navarashtra.com

### माजी मंत्री पाटणकर यांचे प्रतिपादन; पाटणमध्ये महोत्सवाचे आयोजन

# रानभाज्यांचा वारसा जपा

पाटण, (वा.) सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या तालुक्यातील परिसर निसर्गसंपन्न दऱ्याखोऱ्यांनी नटलेला आहे. येथील दाट जंगलात विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींसह विविध प्रकारच्या रानभाज्या मोठ्या प्रमाणात आढळतात. मात्र आधुनिक जीवनशैली व पाश्चिमात्य अन्नसंस्कृतीच्या प्रभावामुळे आजच्या तरुण पिढीत याचे ज्ञान कमी होत चालले आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, युवा मंडळे आणि स्वयंसेवी संस्था यांनी पुढाकार घेऊन रानभाजी महोत्सवाचे आयोजन करून पुढील पिढीसाठी हा नैसर्गिक वारसा जपावा, असे आवाहन माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले.

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग व रोटरी क्लब, पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने रानभाजी व तृणधान्य महोत्सव आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते. यावेळी कोयना शिक्षण संस्थेचे संचालक याज्ञसेन पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. शिरीष पवार, प्रा. डॉ. बी. व्ही. जाधव, रो. किशोर तुळसनकर, प्रा. डॉ. हेमलता काटे, प्राचार्य चेतन सावंत, प्रा. एस. ए. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.



### आजच्या धकाधकीच्या जीवनात रानभाज्या हे नैसर्गिक मेडिटॉक्स फूड्स म्हणून उपयोगी

माजी मंत्री पाटणकर म्हणाले, आपल्याकडे सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात उगवणाऱ्या अनेक औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या आहेत. त्या आपल्या आरोग्यासाठी उपयोगी आहेत. ज्यांना याची माहिती आहे त्यांनी हा वसा पुढील पिढीला दिला पाहिजे. या भाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात लोह, कॅल्शियम, फायबर्स, अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे आढळतात. विशेषतः आजच्या धकाधकीच्या जीवनात रानभाज्या हे नैसर्गिक मेडिटॉक्स फूडस म्हणून उपयोगी ठरतात. प्रत्येकाने या भाज्यांचा आहारात समावेश करून आरोग्यदायी जीवन जगण्याचा राजमार्ग साकारला पाहिजे, असे आवाहन केले.



### महोत्सवात ९० विद्यार्थ्यांचा सहभाग; स्पर्धकांना रोख पारितोषिक

महोत्सवात ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये भारगा, टाकळा, वाईवरण, कोकणतोंडा, शेंडवळ, आळंबी, भोकर, उंबर, मुरड, अशा विविध रानभाज्या वापरून विद्यार्थ्यांनी अतिशय रुचकर भाज्या बनविल्या होत्या. परीक्षकांनी स्पर्धेची पाहणी करून स्पर्धकांना रोख पारितोषिक दिली. रानभाजी महोत्सव स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. एस. ए. गायकवाड, प्रा. अनिल पाटील, प्रा. प्रवीण गायकवाड, प्रा. डॉ. रचना थरवल यांनी काम पहिले. प्रा. बी. व्ही. जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मंजुषा शिंदे यांनी आभार मानले.